लोकमत

# नाट्यसंमेलनाचा समारोप..सारेच भावुक झाले; पालकमंत्र्यांनी कार्यवाहला दिले स्वत:चे घड्याळ

## स्वागताध्यक्ष चंद्रकांत पाटील : रसिकांनी कलाकारांच्या पाठीशी उभे राहावे

इन्फो स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : नाट्य रंगभूमी पुढे येण्यासाठी लोकाश्रय मिळावा. रसिकांनी कलाकारांच्या पाठीशी उभे राहावे, ज्यायोगे नाटकांचा सुवर्णकाळ पुन्हा एकदा अनुभवता येईल असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. नाट्यसंमेलनाच्या समारोप समारंभात सारेच भावूक झाले. स्वागताध्यक्ष पाटील यांनी कार्यवाह विजय साळुंके यांना उत्तम आयोजनाबद्दल घड्याळ भेट दिले.

शंभराव्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाचा हस्तांतरण सोहळा नॉर्थ कोट मैदान, सोलापूर येथे रविवार २८ जानेवारीला पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, सिने कलाकार किशोर महाबोले, नीलम शिर्के सामंत, दीपक करंजीकर, अशोक हांडे, अतुल परचुरे, सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रा. शिवाजी सावंत, कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार, प्रमुख कार्यवाह विजय साळुंके, कार्याध्यक्ष अविनाश महागावकर, समन्वयक मोहन डांगरे, स्वागत सचिव प्रशांत बडवे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील नाट्य परिषदेच्या शाखेचे अध्यक्ष उपस्थित होते.



नटरंग या स्मरणिकेचे प्रकाशन करताना स्वागताध्यक्ष चंद्रकांत पाटील, संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, प्रा. शिवाजी सावंत, डॉ. सुहासिनी शहा, प्रकाश यलगुलवार आदी.

यावेळी पालकमंत्री चंद्रकात पाटील म्हणाले, मराठी रंगभूमी आणि मराठी रंगकर्मी यांनी या देशातील रंगभूमी टिकविण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी रंगभूमी सर्वोत्तम असल्याने ती टिकविणं, जगविणं आपली जबाबदारी आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या हृदयात नाटकाचा भाव पोहोचून रसिकांनी तिकीट काढून नाटक पाहावे आणि महाराष्ट्रात या माध्यमातून नाट्य रसिकांची संख्याही वाढावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यापीठातून युवा कलावंत निर्माण व्हावेत यासाठी शासनाकडून विद्यापीठाच्या कला विभागास अनुदान देण्यात येते. कला विभागाला ज्यादाचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येईल असेही पालकमंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल म्हणाले, सांस्कृतिक चळवळ पुढे नेण्याचे काम नवी पिढी करणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना नाट्य, संगीताचे शिक्षण दिले गेल्यास त्यांची सांस्कृतिक जाण अधिक प्रगल्भ होईल. विद्यापीठातून उत्तम नट, गायक तयार व्हावेत यासाठी विद्यापीठातील कला विभागाला शासनाने आर्थिक सहकार्य करावे. विद्यापीठाला ५ कोटींचा निधी द्यावा. त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नव कलावंत तयार होतील. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### डोळ्यात तरळले अश्रू



संमेलनाचे कार्यवाह विजय साळुंखे यांनीही मनोगत व्यक्त केले. सोलापूर येथे १०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य पार पडण्यासाठी यशस्वीरीत्या काम केल्याने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्वतःच्या हातातील घड्याळ विजयदादा साळुंके यांना भेट दिले. यावेळी साळुंखे रंगमंचावरच भावुक झाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू आले. त्यांच्या कामाचे कौतुक म्हणून रसिकांनी टाळ्या वाजविल्या.

### पुणे-मुंबईतील नाटके यावीत सोलापुरात

राजश्री शाहू महाराज यांनी राज्यातील त्यांच्या काळात कलाकारांना तसेच संगीताला राजाश्रय दिला. तसा राजाश्रय आता मिळावा. मुंबई-पुण्यात होणारी उत्तम व व्यावसायिक नाटके सोलापुरात यायला हवीत. नाट्य परिषदेने जिल्हास्तरीय समिती स्थापन करून उत्कृष्ट नाटक आणण्यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा जब्बार पटेल यांनी व्यक्त केली.

### नाटक व कलावंतांसाठी विविध योजना

शंभरावे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन पाच महिने सुरु राहणार असून या संमेलनाचा सांगता सोहळा रत्नागिरीत होणार आहे. याशिवाय या पाच महिन्यांच्या नाट्य संमेलनाच्या कालावधीत सर्व कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रम आणि स्पर्धा घेण्यात येणार आहे. शासनाने ज्येष्ठ व गरजू कलावंतांना आरोग्य, घरकुल आधी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. नाट्य परिषद नाट्यक्रमासाठी विविध योजना राबविणार असल्याचे यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी सांगितले.